जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३१० दिनांक - ०६/०८/२०२४**

वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर

## दोन आरोपींचे ताब्यातुन ३० सायकल केल्या जप्त

दि.१०/०७/२०२४ रोजी वारजे माळवाडी पोलीस स्टेशनचे तपास पथकातील पोलीस अंमलदार सुतकर यांना त्यांचे गोपनीय बातमीदारमार्फत माहिती मिळाली की, दोन मुले हे चोरीची सायकल वापरत आहेत सदरची बातमीची खात्री करणे कामी तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप निरीक्षक पार्वे सोबत पोलीस स्टेशनचे तपास पथकातील अंमलदार यांचे सह बातमीचे ठिकाणी पोहचुन आरोपी नामे १) **शिवशंकर राजेंद्र जाधव, वय ३० वर्षे, रा.गणपती मंदिराच्या मागच्या बाजुला, संभानगर, कर्वेनगर, पुणे** व २) **अभिषेक प्रकाश जाधव, वय २४ वर्षे, रा.गणपती मंदिराच्या मागच्या बाजुला, संभानगर, कर्वेनगर, पुणे** यांचे ताब्यातुन वारजे माळवाडी पोलीस ठाणे गुरनं २७७/२०२४ भादंवि कलम ३७९ मधील दिनांक ०१/०५/२०२४ रोजी ते दिनांक २८/०६/२०२४ रोजीचे दरम्यान रघुनंदन प्लाझा, शोभापुरम सोसायटी जवळ वारजे येथील सोसायटीचे कॉमन पार्किंग मधुन चोरीस गेलेली सायकल ताब्यात घेण्यात आली. त्यानंतर नमुद दोन्ही आरोपींकडे तपास करत असताना त्यांनी वारजे माळवाडीचे आसपासचे भागातुन गेले दिड वर्षापासुन सायकलचोरी करत असल्याचे सांगितल्याने नमुद दोन्ही आरोपींचे ताब्यातुन एकुन ३० सायकल जप्त करण्यात आल्या आहेत.तसेच ज्या लोकांच्या सायकल ह्या सुमारे दिड वर्षामध्ये चोरीस गेलेल्या आहेत त्यांनी आपले सायकलच्या मालकी हक्काचे कागदपत्र तसेच फोटोसह वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर येथे संपर्क साधावा.**संपर्क क्रमांक वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर ०२०/२५२३७७७७**

सदरची कामगिरी ही मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे श्री.प्रविण पाटील, मा. पोलीस उप-आयुक्त परि.३,पुणे श्री.संभाजी कदम मा.सहा.पोलीस आयुक्त कोथरुड विभाग,श्री.रंगनाथ उंडे वारजे माळवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.मनोज शेडगे,पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. निळकंठ जगताप यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक रणजीत मोहिते, पोलीस उप निरीक्षक रामेश्वर पार्वे, पोलीस अंमलदार प्रदिप शेलार,मनोज पवार,विजय भुरुक,दक्ष पाटील,श्रीकांत भांगरे,विक्रम खिलारी,संभाजी दराडे,विकास पोकळे,अमोल सुतकर,सत्यजित लोंढे यांनी केली आहे.



वारजे माळवाडी पोलिस
बाल स्नेही कक्ष
Child Friendly Poli e Station